डॉ. हिरे-अजित पवार भेट

▸▸ नाशिक । प्रतिनिधी

माजी आमदार डॉ. अपूर्व हिरे यांनी सोमवारी (दि. २) राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांची सदिच्छा भेट घेत निवडणुकीतील यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

अजित पवार यांच्या पक्षाने नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत राज्यात ४१ जागांवर विजय मिळवला आहे. हिरे यांचे अजित पवार यांच्याशी पूर्वीपासून जिव्हाळ्याचे संबंध आहेत. अजित पवार यांनी विधानसभा निवडणुकीत मिळवलेले यश पाहता सोमवारी हिरे यांनी त्यांची भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये विधानसभा निवडणुकीत बरोबर आगामी महानगरपालिका व जिल्हा परिषद निवडणुकांबाबत चर्चा झाली. आगामी निवडणुका पाहता अजित पवार यांनी डॉ. हिरे यांना पुन्हा नव्या दमाने काम करण्याची सूचना केली. जिल्ह्यात अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने सातपैकी सात जागा जिंकून दणदणीत विजय मिळवला आहे. जिल्ह्यातील पक्षाचे हे यश पाहता राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षांची पुढील ध्येयधोरणे, रणनीती तसेच आगामी निवडणुकांवर चर्चा करण्यासाठी डॉ. हिरे यांना पुन्हा भेटीचे निमंत्रण दिले आहे. ५ डिसेंबरला नवीन मंत्रिमंडळाचा शपथ विधी होणार आहे. हा शपथविधी सोहळा झाल्यानंतर अजित पवार यांनी आपल्याला बैठकीसाठी निमंत्रण दिल्याचे डॉ. अपूर्व हिरे यांनी सांगितले. ही भेट पाहता डॉ. अपूर्व हिरे पुन्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार पक्षात सक्रिय झाले आहेत.

लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करा

आयोग स्थापनादिन कार्यक्रमात आयुक्त कुलकर्णी यांचे प्रतिपादन

▸▸ नाशिक । प्रतिनिधी

राज्यात लोकसेवा हक्क कायदा २८ एप्रिल २०१५ पासून अंमलात आला. शासनाच्या विविध विभागांकडून, अधिसूचित केलेल्या विविध सेवा, ठराविक मुदतीत प्राप्त करून घेण्याचा अधिकार या कायद्यामुळे नागरिकांना प्राप्त झाला आहे. या विविध अधिसूचित सेवांची 'आपले सरकार' केंद्रचालकांनी माहिती घेवून लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे प्रतिपादन नाशिक विभागाच्या राज्य सेवाहक्क आयोग आयुक्त चित्रा कुलकर्णी यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात आज तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोग, नाशिक आयोजित महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायदा- २०१५ माहिती आणि प्रशिक्षण कार्यक्रमात चित्रा कुलकर्णी बोलत होत्या. यावेळी उपजिल्हाधिकारी (प्रशासन) तुकाराम हुलावळे, नाशिक विभाग राज्य सेवा हक्क आयोगाचे उप सचिव सुनील जोशी तहसीलदार मंजुषा घाटगे, सहाय्यक कक्ष अधिकारी प्रशांत घोडके, महाआयटीचे जिल्हा समन्वयक राहुल धिवरे, अमोल दंडगव्हाळ यांच्यासह जिल्ह्यातील आपले सरकार केंद्रांचे चालक उपस्थित होते.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोग स्थापनेस ३ वर्षे पूर्ण झालेली आहेत.

आपले सरकार केंद्रांचे केंद्रचालक हे नागरिक व प्रशासन यांच्यामधील दुवा आहेत. त्यामुळे नागरिकांना वेळेत सेवा पुरविणे हे प्रत्येक केंद्रचालकचे कर्तव्य आहे. मुदतीत सेवा मिळण्याचा हक्क कायद्याने नागरिकांना दिल्यामुळे आता आपले सरकार केंद्रावर विहित मुदतीत सेवा प्राप्त न झाल्यास ते अपील करू शकतात. आपले सेवा केंद्र चालकांनी या अपील सेवेबाबत नागरिकांना माहिती देणे आवश्यक आहे. अपील सेवेबाबतची माहिती आपले सरकार केंद्राच्या आवारात दर्शनी भागात फलकावर लावल्यास नागरिकांना त्याबाबत माहिती मिळेल. केंद्रचालकांनी आपले दैनंदिन अर्ज त्याच दिवशी निकाली काढल्यास अर्ज प्रलंबित न राहता कामास गती मिळेल, असे कुलकर्णी म्हणाल्या.

उपजिल्हाधिकारी हुलावळे यांनी आपले सरकार केंद्रचालकांना आपल्या कामात सुसूत्रता येण्यासाठी कार्यपद्धती यासोबतच विविध दाखल्यांसाठी लागणारे शासकीय दर याबाबाबत नागरिकांना माहिती उपलब्ध करून देणे, कामात दिरंगाई केल्यास त्याबाबत होणारी कार्यवाही याबाबत मार्गदर्शन केले. केंद्रचालकांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रशासन नेहमीच सकारात्मक असल्याचेही सांगितले.

नागरिकांच्या अर्जाची वेळेत निर्गती करणे हे प्रशासनाचे प्रमुख कार्य आहे. नागरिकांना तत्परतेने सहज व सुलभतेने सेवा मिळण्यासाठी आपले सरकार सोबतच अनेक पोर्टल सुरू करण्यात आले आहे. शासनाच्या ३८ विभागांमार्फत ७७० सेवा शासनाने अधिसूचित केल्या आहेत. त्यापैकी ४८५ सेवा ऑनलाईन तर २८५ सेवा ऑनलाईन सद्यस्थितीत सुरू आहेत. ऑनलाईन अपील सेवाही आपले सेवा केंद्रावर नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली आहे, असे राज्य सेवा हक्क आयोगाचे उपसचिव सुनील जोशी यांनी सांगितले.

सूत्रसंचालन तहसीलदार घाडोरे यांनी केले. यावेळी उपस्थित केंद्रचालकांना शासनाच्या पोर्टलचा उपयोग करण्याबाबत चित्रफितीतून मार्गदर्शन करण्यात आले.

समर्थ भारतासाठी साधूसंतांचे संपूर्ण सहकार्य

विहिंप केंद्रीय मार्गदर्शक मंडळ बैठकीत ग्वाही

▸▸ नाशिक । प्रतिनिधी

समर्थ भारत बनण्यासाठी विश्व हिंदू परिषदेने आखलेल्या कुटुंब प्रबोधन, धर्मांतर रोखणे व सामाजिक समरसता या संदर्भातील धोरणास विविध संप्रदायातील सर्व साधुसंत संपूर्णपणे पाठिंबा देतील व विविध उपक्रमात संपूर्णपणे सहभागी होतील, अशी ग्वाही विहिंपच्या केंद्रीय मार्गदर्शक मंडळ बैठकीत महंतांनी दिली.

विहिंगराव-देवळालीतील कलापूर्णम तीर्थधाममध्ये झालेल्या मुंबई क्षेत्राच्या केंद्रीय मार्गदर्शक मंडळाच्या दोन दिवसीय बैठकीत महंत बोलत होते.

पहिल्या दिवशी जगद्गुरू रामनंदाचार्य यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय महामंत्री मिलिंद परांडे यांनी कुटुंब प्रबोधन, धर्मांतर रोखणे आणि सामाजिक समरसता ही हिंदू समाजापुढील प्रमुख आव्हाने आहेत, असे सांगून याबाबत संतांनी सक्रिय होण्याची गरज मांडली. शहर जितके मोठे तितकी कुटुंब समस्या बिकट. वैवाहिक व्यवस्था धर्माच्या आधाराने उभी आहे. ही पवित्र परंपरा खंडित झाली तर संकट ओढवेल. त्यापासून वाचण्यासाठी जागृती आवश्यक आहे. भोगवाद वाढला असून संस्कार कमजोर ठरत आहेत. सात फेरे घेणारे विवाह सात वर्षे देखील टिकत नाही. डुग, दारूचे व्यसन, स्त्रियांना त्रास देणे, स्त्रीभ्रूणहत्या, सामाजिक कुरीतींना प्रतिष्ठा देऊन आचरण केले जाते. याला संतांनी आळा घालावा. जन्मदर घटत आहे. कुटुंबात किमान दोन तरी मुले हवीत. तरच समुदायाचे रक्षण होईल, असे परांडे यांनी स्पष्ट केले.

सामाजिक समरसता निर्माण करण्यासाठी संतांनी प्रयत्न करावे हे सांगताना परांडे यांनी अनेक शक्ती हिंदूंचा पुढे येऊ देत नाहीत. जाती, प्रांत, भाषा यांचे निमित्त करून एकमेकात लढाई लावली जाते. अस्पृश्यता निर्मूलनाची गरज आहे. अस्पृश्यता ही एक सामाजिक कुरीती आहे त्या विरोधात सर्वसाधारण एकत्रित येण्याची गरज आहे धर्म भेदभाव शिकवत नाही हे जनतेच्या मनावर ठासवण्याची गरज आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत जनार्दन हरी महाराज, अंधेरीचे शिवानंद भारती महाराज, दिगंबर आखाड्याचे भक्तीचरण दासजी महाराज, स्वामीनारायण संप्रदायाचे धर्मप्रकाश शास्त्री, नीलकंठ शिवाचार्य, वारकरी

संप्रदायाचे रामकृष्ण महाराज लहवितकर, महानुभाव संप्रदायाचे विजयराज महाराज, समर्थ संप्रदायाचे मंदारबुवा रामदासी, बौद्ध समाजाचे धर्मरत्न महाथेरो, जैन साधू निलेश मुनी महाराज आदींनी मनोगत व्यक्त केले. कौटुंबिक प्रबोधनासाठी संत समाज सर्वतोपरी सहकार्य करील, असे त्यांनी स्पष्ट केले.

अध्यक्षीय भाषणात जगद्गुरु राजराजेश्वर महाराजांनी प्रभू श्रीरामचंद्रांच्या कुटुंबाचे उदाहरण देत कुटुंबातील प्रेम कसे असावे ते प्रभू रामचंद्र, लक्ष्मण, भरत,दशरथ यांच्या वर्तनातून दिसून येते. आपल्या देशातील विविध संप्रदायांत परिवाराचे महत्त्व सांगण्यात आले आहे. वसुधैव कुटुम्बकम हा आपल्या संस्कृतीचा संदेश असून ऋषी परंपरेचे अनुसरण केले तर संस्कृती व कुटुंबाचे जतन होईल असे सांगून संतांच्या सर्वतोपरी सहकार्याची ग्वाही दिली. सूत्रसंचालन माधवदास राठी महाराज व धार्मिक विभागप्रमुख संजय मुरदाळे यांनी केले.

दुसऱ्या दिवशी संकेश्वर करवीर पिठाचे शंकराचार्य अभिनव विद्या नरसिंह महाराज, विश्व हिंदू परिषदेचे संरक्षक दिनेशचंद्र यांनी बीज भाषणातून सामाजिक समरसता हा विषय विषद केला. बैठकीत वारकरी संप्रदायाचे नारायण महाराज शिंदे, स्वामी भारतानंद सरस्वती मुंबई, जैन मुनि प्रीतीशजी महाराज, आनंद चैतन्य बापू, नागपूरचे भागीरथी महाराज, महानुभाव संप्रदायाचे सुदर्शन महाराज कपाटे, देवगिरी प्रांताचे लक्ष्मण महाराज मेंगडे, पराग बुवा रामदासी, प्रशांत कांदळकर महाराज, लातूरचे महंत विद्यानंद सागर, मारुती महाराज कोल्हटकर, पडघा येथील शिवस्वरूपानंद सरस्वती, स्वामी हरि श्रद्धा नंद महाराज, करपे महाराज, दिगंबर आखाड्याचे रामकृष्णदास शास्त्री, रायगड कर्जतचे मैत्रेय दादा, पोहारादेवी संस्थानाचे राज्यपाल नियुक्त आमदार महंत बाबू सिंग महाराज, श्रीपाद कुलकर्णी, राणा वासकर, बीडचे अमृताश्रमजी महाराज आदींनी विचार मांडले. केंद्रीय धर्मांचार्य प्रमुख अशोक तिवारी यांनी विश्व हिंदू परिषदेच्या विविध योजनांची माहिती दिली. क्षेत्रमंत्री गोविंदराव शेंडे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी प्रांतमंत्री किशोर चव्हाण, धर्माचार्य निधीप्रमुख नागनाथ बोंगारगे, प्रांत सहप्रमुख धनाजी शिंदे, समीर पायगुडे उपस्थित होते. निलेश गाढवे, योगेश बहाळकर, मनोज लोणकर, प्रमोद बोकारे, प्रशांत बोकारे, पंकज अटल, रोहिणी मोरे,प्रदिप क्षीरसागर, किशोर बारटक्के, प्रशांत कुलकर्णी, द्वारकाप्रसाद तिवारी,सुबोध गुजराथी, मोहीत चौधरी आदींसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

मुला-मुलींना उद्या जंतनाशक गोळीवाटप

नाशिक । जिल्हाभरात बुधवारी(दि. ४) राष्ट्रीय जंतनाशक दिन राबविण्यात येणार असून, या दिवशी १ ते १९ वर्षे वयोगटातील सर्व मुला-मुलींना आरोग्य विभागाच्या वतीने जंतनाशक गोळी दिली जाणार आहे.नाशिक जिल्ह्यामधील ग्रामिण व शहरी कार्यक्षेत्रामध्ये ५ हजार २३२ अंगणवाडी केंद्रातील , लाभार्थ्यांना तसेच ६ हजार ६९५ शासकिय, अनुदानित व खाजगी शाळां शालेय विद्यार्थ्यांना १२ लाख ३६ हजार ३४९ लाभार्थ्यांना जंतनाशक गोळी देण्यात येणार आहे. जे लाभार्थी बुधवारी आजारी असेल किंवा इतर कारणामुळे गोळी घेणे शक्य झाले नाही, त्यांना (दि १० डिसेंबर) शाळा व अंगणवाडी केंद्रामध्ये मॉप अप दिनी गोळी देण्यात येणार आहे.

१ ते १९ वर्ष वयोगटातील अंगणवाडी, शालेय विदयार्थी व शाळाबाहय मुले-मुली यांनी जंतनाशक गोळी घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी जलज शर्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. नाशिक अशीमा मित्तल यांनी केले.या मोहिमेचे यशस्वी नियोजन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे , जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ चारुदत्त शिंदे, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी हर्षल नेहते यांनी केले आहे.

सिंहस्थ तयारीची आज आढावा बैठक

नाशिक । आगामी कुंभमेळ्यास दोन वर्षापेक्षा कमी कालावधी राहिल्याने आता शासकीय यंत्रणा आराखडा आणि नियोजन करण्याच्या कामाला लागली आहे. त्यानुसार आज (दि.३) सिंहस्थ नियोजनाची बैठक विभागीय आयुक्त डॉ. प्रविण गेडाम यांच्या उपस्थितीत होणार आहे. यात मागील बैठकीत ठरल्यानुसार इतर हेड आणि योजनांतून जी कामे होणे शक्य आहे ती वगळून केवळ सिंहस्थासाठीचीच कामे नियोजित आराखड्यात ठेवण्याचे निश्चित झाले आहे. त्यानुसार आवश्यक कामे आजच्या बैठकीत सादर होण्याची शक्यता आहे.

दर मंगळवारी सर्व विभागांची समन्वय बैठक घेण्याचे ठरल्यानुसार आता लोकसभा अन् त्या पाठोपाठ विधानसभा निवडणुकांमुळे झालीच नाही. परंतू आचारसंहिता संपताच जिल्हा प्रशासनाने बैठकीचे आयोजन केले आहे. या बैठकीत महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा, पुरातत्व विभाग, आरोग्य अन् इतर सर्वच विभागांना सिंहस्थाचीच कामे आपल्या आराखड्यात सादर करावी लागणार आहे. त्यानुसार आजचा हा आराखडा सादर करावा लागणार असून, त्यात इतर विभागांचीही कामे एकमेकांमध्ये धरली जाऊ नये यावरच निश्चिती होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शहरातील इंटरलिंक रस्ते, साधुग्राम, नदीवरील पूल उभारणी, अन् इतर बाबी या सार्वजनिक बांधकामद्वारे केली जाण्याची शक्यता आहे. सादर केलेल्या आराखड्यातून काही कामे मनपाला वगळावी लागण्याची शक्यता आहे. त्या जागी मनपा अत्यावश्यक कामेच समाविष्ट करण्याचे संकेत मिळण्याची शक्यता आहे.

सहस्रबुद्धे कुलसंमेलनाला प्रतिसाद

नाशिक । नव्या पिढीने आपल्या आधीच्या पिढ्यांचे सामाजिक, सांस्कृतिक व विविध क्षेत्रातले योगदान जाणून घ्यावे. बदलत्या काळानुसार आपल्या सहयोगाची समिधा अर्पण करावी. नाशिकमधील संमेलनातून सर्वांनी प्रेरणा घेऊन आपले संघटन अधिक मजबूत करावे, असा सूर दोन दिवसांच्या संमेलनात उमटला. नाशिकमध्ये सहस्रबुद्धे कुल संमेलन नाशिकरोड येथील आर्टिलरी सेंटर रस्त्यावर मोती मंगल कार्यालयात झालेल्या संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. वसंत सहस्रबुद्धे होते. योगतज्ज्ञ ए.डी.सहस्रबुद्धे, संवादिनी वादक उपेंद्र सहस्रबुद्धे, कवयित्री स्वाती सहस्रबुद्धे आदी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. रविवारी सकाळी सर्वांनी भगूर येथे स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जन्मस्थळाला भेट दिली. यावेळी कॅप्टन शेखर सहस्रबुद्धे यांनी सावरकरांच्या शौर्यगाथेचे स्मरण करून त्यांच्या विविधांगी कार्याला नमन केले. चित्पावन ब्राह्मण संघातर्फे अध्यक्ष विजय साने यांनी सहस्रबुद्धे कुलप्रतिष्ठानला देणगी दिली. पुढील संमेलनाची जबाबदारी युवकांच्या हाती सोपवण्यात आली. सायंकाळी सर्वांनी गोदाआरती केली. यशस्वितेसाठी सुशील सहस्रबुद्धे, नितीन सहस्रबुद्धे, सुवर्णा सहस्रबुद्धे यांनी परिश्रम घेतले.

कर अभय योजना लाभदायी

मनपा तिजोरीत ३३ कोटींची भर

नाशिक । प्रतिनिधी

आर्थिक स्थिती नाजुक असलेल्या नाशिक महापालिकेला कर शास्तीवर ९५ टक्केपर्यंत सूट देणारी अभय योजना चांगलीच पावल्याचे चित्र आहे. मागील सुमारे दोन महिन्यात मनपाच्या तिजोरीत तब्बल ३३ कोटी रुपयांची भर पडली आहे. दरम्यान, विधानसभा निवडणूक व इतर कारणांनी लोकांनी लाभ घेण्यासाठी वेळ मिळाला नसेल म्हणून मनपाने योजनेला मुदतवाढ देखील दिली आहे.

१ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर याकाळात ३४ हजार ९७४ नागरिकांनी ३३ कोटींची थकबाकी अदा करत एकूण बिल रक्कमेवरील शास्तीवर ९५ टक्के सुट मिळवली आहे. ते पाहता महापालिका प्रशासनाने ९५ टक्के माफिचा लाभ नागरिकांना घेता यावा यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. १ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत कर भरल्यास एकूण बील मूळ रकमेच्या

शास्तीवर ९५ टक्के माफी देण्यात आली. १ डिसेंबर ते ३१ डिसेंबर ८५ टक्के व १ जानेवारी ते ३१ जानेवारी या कालावधीत ७५ टक्के सवलत शास्तीवर मिळणार आहे. दरम्यान १ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर या दोन महिन्याच्या कालावधीत ३४ हजार ९४७ नागरिकांनी मालमत्ता थकबाकी अदा केली. त्यामाध्यमातून ३३ कोटी २७ लाख इतका भरणा मनपाच्या तिजोरीत झाला. तब्बल १८ कोटींची शास्ती माफी नागरिकांनी पदरात पाडून घेतली. नागरिकांचा वाढता प्रतिसाद पाहता ९५ टक्के शास्ती माफी मिळावी यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. नागरिकांनी थकबाकी अदा करुन सहकार्य करावे असे आवाहन मनपा प्रशासनाने केले आहे.

तुमच्या भागात खड्डा; मनपाला व्हॉटसॲप करा

नाशिक । प्रतिनिधी

शहरातील विविध विभागातील रस्त्यातील खड्ड्यांबाबत व नादुरुस्ती बाबतच्या तक्रारी स्वीकारण्याची व त्यासंदर्भात कार्यवाही करण्यासाठी नाशिक महानगरपालिकेने चार तक्रार निवारण यंत्रणा सुरू केल्या आहे. त्यात मनपा संकेतस्थळ, मोबाईल ॲप, हेल्पलाईन नंबर ७०३०३००३०० व व्हॉटसअप क्रमांक ७९७२१५४७९३ देण्यात आले आहे. नागरिकांनी रस्त्यावरील खड्ड्याबाबत व नादुरुस्ती संदर्भात तक्रारी, सुचना याद्वारे मनपाला कळविण्याचे आवाहन मनपा आयुक्त डॉ. अशोक करंजकर व शहर अभियंता संजय अग्रवाल यांनी केले आहे.

भुजबळ पालकमंत्री होण्यासाठी राष्ट्रवादीचे महादेवाला साकडे

▸▸ नाशिक । प्रतिनिधी

छगन भुजबळ हे नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री व्हावे यासाठी राष्ट्रवादी युवक

कॉंग्रेसचे शहराध्यक्ष अंबादास खैरे यांनी महादेवाच्या पिंडीला दुग्धाभिषेक करीत साकडे घातले.

छगन भुजबळ हे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते असून नव्या मंत्रिमंडळाच्या शपथविधी दरम्यान तेही मंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. भुजबळ यांनी सर्वाधिक वेळा जिल्ह्याचे पालकमंत्रिपद भूषवल्याने त्यांचा अनुभव देखील दांडगा आहे. सन २०२७ मध्ये नाशिकमध्ये कुंभमेळा होत असून यामुळे जागतिक पातळीवर नाशिकचे नाव चर्चिले जाणार आहे. भुजबळ हे पालकमंत्री असताना कुंभमेळा झाला होता यात त्यांनी केलेले यशस्वी नियोजन व विकासकामे आजही आठवणीत आहे. मागील कुंभमेळात पालकमंत्री नसताना देखील त्यांनी अनेक कामे केल्याचे निदर्शनास येते.

दुग्धाभिषेकावेळी योगेश निसाळ, अमोल नाईक, मुकेश शेवाळे, डॉ. संदीप चव्हाण, हर्षल चव्हाण, व्यंकटेश जाधव, संदीप खैरे, निलेश जाधव, कुलदीप जेजूरकर, रेहान शेख, हरिष महाजन, महेश बाळसराफ, भूषण पाटील, दिपक बने, आशुतोष चव्हाण, जयेश टोचे, हर्षल वाघ आदींसह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आठ दिवसांत शहर खड्डेमुक्त करा

मनसेनेचा मनपाला आंदोलनाचा इशारा

▸▸ नाशिक । प्रतिनिधी

शहरातील महत्वाचे रस्ते तथा कॉलनी रोड यांची झालेली दुर्दशा तसेच शहरातील आरोग्याच्या समस्यांबर मनपा प्रशासनाने त्वरित कारवाई करावी, अन्यथा, मनसेना स्टाईल आंदोलन करण्याचा इशारा मनसेनेकडून मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.अशोक करंजकर यांना देण्यात आलेल्या निवेदनात देण्यात आला आहे. शहरातील रस्ते तसेच कॉलनी रोडवर प्रचंड खड्डे पडलेले असून, त्यामुळे नाशिक शहरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे, मनपाने वेळोवेळी खड्डे बुजविण्याने ठेके दिले असून, नावापुरता खड्डे बुजवले गेलेले आहे. खड्डे बुजवल्यानंतर लगेचच ते खड्डे पुन्हा जैसे ते स्थितीमध्ये येतात, त्यामुळे अपघातांना निमंत्रण मिळत आहे. त्याच प्रकारे शहरातील विविध मागात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता असल्याने विविध आजारांना त्यामुळे निमंत्रण मिळत आहे. यामुळे सामन्य नागरिकांना त्रस्त झाले आहे. शहरातील विविध भागात पाणीपुरवठा सुरळीत होत नाही. त्यामुळे महिला वर्गात संताप असून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा, आदी मागण्या निवेदनात करण्यात आले आहे. येत्या ८ दिवसात मनपाकहून कारवाई न झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनातर्फे आंदोलन करुन मनसेना स्टाईलप्रमाणे धडा शिकवण्यात येईल. त्याची पूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष सलीम शेख, माजी सभागृह नेते दिनकर पाटील, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे, ॲड.संदेश जगताप, सत्यम खंडाळे, धीरज भोसले, सचिन सिन्हा, योगेश दाभाडे, वैभव रौंदळ, प्रवीण अहिरे,लक्ष्मण साळवे,पंकज कोठावदे आदी उपस्थित होते.

बांधकाम कामगारांच्या मागण्यांसाठी आयटकचे आंदोलन

विभागीय कामगार उपआयुक्तांना निवेदन

▸▸ नाशिक । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून बांधकाम कामगारांची नोंदणी, नूतनीकरण व लाभ देण्याबाबतची ऑनलाईन वेबसाईट व पोर्टल कामगारांना व्यक्तिगत अर्ज दाखल करण्यासाठी बंद ठेवण्यात आली आहे. त्यामुळे मंडळाचे संपूर्ण कामकाज कोलमडून पडले आहे. शासनाच्या ३२ योजनांचा लाभ बांधकाम कामगारांना मिळून द्यावा यासाठी विभागीय कामगार उपायुक्त सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयावर धरणे आंदोलन करण्यात आले. विभागीय कामगार उपआयुक्त विकास माळी यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातून केवळ तालुकास्तरावर सुरू केलेल्या कामगार सुविधा केंद्रावरूनच अर्ज सादर करण्याची अट घालण्यात आली आहे. ही केंद्रदेखील पूर्णपणे सुरू झालेली नाहीत. त्यात नियमित कामकाज सुरू झाले नाही. तेथील कर्मचाऱ्यांना त्याची पूर्ण माहिती नाही. त्यामुळे तेथे प्रत्यक्ष कामगारांची कामे होत नाहीत. त्यामुळे लाखो कामगारांची कामे अडकून पडली आहेत. आचारसंहितेत वेबसाईट सुरू ठेवण्याबाबत उच्च न्यायालयाने आदेश पारित केलेले असताना देखील वेबसाईट सुरू ठेवण्यात आलेली नाही. तालुका केंद्रांवरच संपूर्ण कामकाज सोपवून केंद्रीकरण केल्यास त्यात कंपनीची व तेथील कर्मचाऱ्यांची मक्तेदारी वाढणार आहे, अशा कामगारांच्या तक्रारी आहेत. ज्या प्रमाणे गृहोपयोगी साधनाच्या वाटपा वेळी जो गोंधळ उडाला आणि कामगारांची कुचंबणा झाली त्याच प्रमाणे कामगारांची मोठ्या प्रमाणावर तालुकास्तरावर गर्दी होणार आहे. त्या गर्दीला नियंत्रण मिळवण्यासाठी संघर्षाची

परिस्थिती निर्माण होणार आहे. असे असताना कामगारांची वेबसाईट पूर्व सुरू करण्यात आलेली नाही. बांधकाम कामगारांचे कामकाज सुरळीत करण्यासाठी व बत्तीस योजनांचा लाभ बांधकाम कामगारांना मिळून देण्यासाठी विभागीय कामगार उपायुक्त सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयावर धरणे आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार फेडरेशनचे जिल्हा सचिव भिमा पाटील आणि सुनीता कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली व राजू देसले यांच्या मार्गदर्शनानुसार आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी आयटकचे जिल्हाध्यक्ष व्ही. डी. धनवटे यांनी मार्गदर्शन केले. बांधकाम कामगारांना फेशन व बोनस योजना लागू त्वरित झाल्या पाहिजेत, अशी मागणी त्यांनी केली.

याप्रसंगी अनिल पठारे, सुकदेव जोंधळे, दीपक गायकवाड, सौज्यनी गोतपागर , दिपाली पठारे, सविता क्षीरसागर, पंडित श्रीराम, चंद्रभान लांडगे, हमीद गुलाब शेख, मनिषा कदम मीनाक्षी डुकरे,रमेश वेताळ, बाळू भालेराव, सुभाष दवंडे असे प्रमुख पदाधिकारी आणि विविध तालुक्यातून कामगार उपस्थित होते.